1990

चैतन्य लहरी

मराठी आवृत्ति खंड 2 अंक 1



।। श्री माताजी निर्मला देवी ।।

आत्मसाक्षात्कार हा अंतिम सत्याबरोबरचा पहिला सामना आहे.

सहजयोगाच्या सुवर्णयुगाची घोषणा करीत नव्या वर्षाने पदार्पण केलं. नवीन वर्षाच्या आगमनासाठी आपल्या प.पू.श्री माताजींच्या कृपेमध्ये परमचैतन्याने अनेक घडामोडी जगामध्ये अशा कांही चमत्कारीकरित्या घडवून आणल्या आहेत. ही दूरदृष्टी आपल्याला असणं शक्य नव्हतं. पण एकोणीसशे एकोणनव्वद मध्ये प.पू.श्री माताजींच्या चित्ताने "आयर्न कर्टन"चे भेदन करून अनपेक्षित, आनंदमय, आश्चर्यकारक घटना घडवून आणल्या आहेत. पौराणिक ग्रंथांत केलेल्या भाकिताप्रमाणे लोक सोव्हीयत युनियनमध्ये हजारोंच्या संख्येने आत्म साक्षात्कार घेत आहेत. आणि तिथून अत्यंत जलद गतीने तो "इस्ट ब्लॉक" मध्ये पसरत आहे. आपल्या प.पू. श्री माताजींनी टर्कीला भेट देऊन "मिडल ईस्ट" चं प्रवेशद्वार आशिर्वादित केलं आहेच. अफ्रिका आणि चीन इकडे त्यांचं लक्ष जाईपर्यंत ही पृथ्वी अखिल विश्वाचा एक अत्यंत आनंदी अंश होईल तर असं हे आपलं नवं वर्ष आहे, श्री माताजी, आमचे आपणांस शतशः प्रणाम.

श्री माताजींनी परमचैतन्याच्या अलिबाग येथे केलेल्या वर्षावातून आमच्या साधनेच्या यात्रेचा प्रारंभ झाला. इथे सर्व साधकांना फार महत्वाचा उपदेश त्यांनी दिला. तिथून साधक औरंगाबाद व पुढे श्रीरामपूरला गेले. पुण्याला सरोवराकाठी झालेली ख्रिसमस पुजा ही एक क्वचितच लाभणारी मेजवानी होती. श्री माताजींनी श्री ख्रिस्ताच्या आगमनाचं महत्व सांगून त्यांच्यासारखे पवित्र कसे व्हायचे ते समजाविले. ते इतके प्रभावी होते की आमच्या पैकी अनेकांना आपला पुनर्जन्म झाल्यासारखं वाटलं. ब्रम्हपुरीच्या पुजेच्या वेळी त्यांनी आपल्या उपदेशात संतपण अंगीकारून मानवतेच्या उध्दारासाठी आपण खूप कार्य केलं पाहिजे यावर भर दिला. सांगली पुजेने नवं वर्ष अत्यंत आनंदात साजरे झाले. इथे पुढे होणा-या लग्नांची नावे जाहीर केली, लग्न-संबंधाविषयी श्री माताजींनी सखोल उपदेश केला. त्यानंतरचा गणपतिपुळयाचा स्वर्गीय अनुभव फक्त-

'ऑन द शोअर्स ऑफ भारत, द मदर इज अवेक'

या श्री. रविन्द्रनाथ टागोरांच्या काव्यामध्ये हर्षभरीत होऊन नाचतच अनुभवता येईल.

**औरंगाबाद पुजा**

आजचा दिवस फार महत्वाचा आहे कारण औरंगाबाद, म्हणजे आमच्या घरी आल्यासारखं वाटतं मला. जवळच पैठण म्हणजे प्रतिष्ठान आहे. तिथे आमचे पूर्वज राहीलेले आहेत. ते सगळं आपल्याला माहीतच आहे. तर सांगायचं असं की सहजयोगाबद्दल गहन आस्था पाहीजे. छत्तीस देशांतले लोक आले आहेत गणपती म्हणजे काय ते माहीत नाही त्या लोकांनी ध्यानधारणा करून इतकं मिळवलं आहे. आणि ते इतके उतरले तर आपण किती मिळवलं पाहीजे आणि आपण किती पुढे जायला पाहीजे, पण तसं आपलं होत नाही.

त्याला कारण रशियाला जाऊन माझ्या लक्षांत आलं की रशियात हजारो लोक सहजयोगांत आले. दोन हजार बाहेर, तर दोन हजार आंत, हॉलमध्ये. दुस-या दिवशी 'परत या' म्हटलं तर परत चार हजार तिकडे, आणि त्यांना पार केल्यावर, ते जमतात. शिस्तशीर 4 ला उठून आंघोळ करून पांच ते सहापर्यंत ध्यानाला बसतात, सगळे यच्चयावत. इथे तसं नाही. सगळ्या कर्माला आपल्याला वेळ आहे. बहीणीच्या, मुलीच्या, आमक्याच्या तमक्याच्या लग्नाला जाऊ आपण अजून .... 2

आपल्यामध्ये त्याचं हे रूप आहे. कुसंस्कार आहेत हे सारे, ती माझी बहीण मग ती सहजयोगीनी नाही, तर त्याचं काही नातं नाही "हेचि सोयरे होती" म्हणून सांगितले आहे ज्ञानेश्वरांनी. तुमचे सोयरे हे, ती सोयरीक आतां आपण विसरायची या मंडळींना बघा. तुमचे सोयरे हे. सगळे सोडून तुमच्यासारखी वस्त्रे घालून बसले आहेत हे इथे. तसेच आपणही आपलं हृदय उघडले पाहीजे.

तसेच कुठेही गेलं की आपण माझ्या भावाच्या आईला अमक्याच्या तमक्याला हा रोग आहे म्हणून हजर. दत्त. पाहीले!

सगळा हाच विचार की माताजींचा कसा उपयोग करून घ्यायचा, अरे, माझा काय फायदा करून घ्यायचा आहे, मला आत्म्याला मिळवायचं आहे - मला आत्म्यामध्ये उतरायचं आहे, माझंस्व:ताचं उत्थान करून घ्यायचं आहे यांच्यांत राहीलं काय? बाकी सगळं तर आहेच. अमुक झालं, तमुक झालं, नुसते जगभरचे प्रश्न माझ्यासमोर ठेवायचे मग मला असं वाटतं की हे लोक देवाला शोधत आहेत, की जगाच्या कांहीतरी गोष्टी शोधत फिरत आहेत. आणि सहजयोग वाढायला पाहीजे. जो आपला वारसा आहे. या जमिनीत, आपल्या पूर्वजांनी मेहनत घेतलीय, संतसाधूंनी रक्त ओतलंय इथे, तर वाढायला पाहीजे. या ठिकाणी सहजयोग वाढायला पाहीजे.

पण आतां एखादा दुष्ट येऊं द्या, भामटा येऊं द्या, पैसे घेणारा येऊं द्या की हजारो येऊन उभे राहतील. ते सत्यसाईबाबांचं भूत असलं किंवा आणि कोणाचही भूत असलं तरी. कोणत्या तरी गुरूच्या पाठी लागून आपण वाया जातो याची कोणाला कल्पनासुध्दां येत नाही. बहुतेक लोकांना कॅन्सरचा रोग, वगैरे हे रोग गुरूच्यामुळे होतात, कारण हे लोक प्रेतविद्या, भूतविद्या, स्मशानविद्या कांहीतरी करतात. आणि लोकांना आपल्याकडे आकर्षून घेतात. आतां पैसे काढत असतात सारखे! गुरूला काय गरज आहे, पैसे काढण्याची ?

आम्ही श्रीमंत घराण्यांतले, साहेबांची मोठी पदवी म्हणून आम्ही सगळं घालतो. उद्यां जर आम्ही गरीबीच्या घराण्यांत जन्मलो असतो, तर गरिबीत राहीलो असतो - आम्हाला कांही मोठा त्रास होत नाही. कुठेही झोपलो असतो. इथे म्हणाल तर इथे. पण त्यांचे लक्ष कुठे आहे, हे पाहिले पाहीजे. असे अनेक गुरू आहेत. त-हेत-हेचे. केवढे गुरू बोकाळले आहेत. आता ते गजानन महाराज. केव्हढा त्रास झाला मला त्या माणसाचा ग बाई. तो फारच वाईट माणूस होता. ज्यांनी त्यांची पोथी वाचली, त्यांना काहींनां काहीतरी रोग होणार. पन्नास वर्षांपर्यंत तो माणूस टिकला तर नशीब समजायचं. हे तर स्पष्ट सांगते तुम्हाला. त्यांच्या पोथ्या विथ्या काय, ते गोदावरीत नेऊन घाला. ज्यांनी त्यांच्या पोथ्या वाचल्या, त्यांचे चेहरेच असे असतात. विश्वासच बसत नाही. सहजयोगांत येऊनसुध्दा चालू असतं त्यांचं काम.

तर इकडे लक्ष घालायला पाहीजे. धर्म म्हणजे काय? धर्म म्हणजे आपल्यामध्ये जी धारणा होते. 'धारयेति सा धर्मः' ती धारणा काय आहे? तर आपल्यामध्ये दहा धर्म आहेत. ते जागृत झाले पाहीजेत. ते कुंडलिनीशिवाय होऊ शकत नाहीत. उद्यां मी म्हणाले, खोट बोलूं नकोस, तसं

जमणार नाही, चोरी करून नको, ते जमणार नाही. कोणाला लंगफंग करू नको. दुखवू नको, बोलू नको, होणार नाही. पण हे धर्म आपोआपच आतमध्ये जागृत झाले. मग सांगायची गरजच काय? सगळ काही आपोआप सुटत. आपोआप होत तर सांगायची गरज काय? कारण तुमच्या आंतमध्ये ते धर्म आहेत. जशा तुम्ही या इथे, या पणत्या लावल्या आहेत; समया लावल्या आहेत, त्या समयांना दीप लावला तर प्रकाश येणारच की नाही? तसाच तो प्रकाश, पण तो कार्यान्वित होतो, तो नुसता प्रकाश नाही, त्याचं कार्य घडतं. त्याच्या कार्याने सशक्तता येते. सशक्त झाला, त्यांच्यांत ती शक्ति आली मग तो कोणाला जुमानत नाही. हे केव्हढं मोठं आपल्याजवळ दान आहे. साधुसंतांच आहे, शिवाजीमहाराजांचं आहे. काय पुरूष होता तो. तो पण एक आत्मसाक्षात्कारी महापुरूष होता. तो ही आपल्या इथेच होऊन गेला. तेव्हा आपलं तसं आयुष्य झालं पाहीजे हे शिकलं पाहीजे.

यांच्यापासून तसं शिकण्यासारखं काही विशेष नाही, मी तुम्हाला सांगते. एकच शिकण्याचं आहे, की ज्यांनी गणपतीला कधी जाणलं नाही, ते योगी होऊन कसे गहनतेत उतरले. तेव्हां हे जे गहनतेत उतरले, तेव्हा त्यांच्यात कांही गहनता आहे. बाकी आपण फॉरीनच्या लोकांकडून शिकण्यासारखं आहे असे म्हणतो; त्यांच्यांत ते काही शिकण्यासारखे नाही. त्यांच्या संस्कृतीत काही शिकण्यासारखं नाही, चांगलं नाही. सगळा सर्वनाश होतोय तिकडे.

तुम्ही बघाल तर लंडनसारख्या, इंग्लंडसारख्या देशांत एका आठवडयात दोन मुलांना आईबाप मारीत असतात. आपल्याकडे कोणी मारतं का मुलांना? असे म्हणजे अमेरीकेत तर तुम्ही जाऊ शकत नाही. दागिने घालून, सगळे काढून घेतील, ओढून घेतील, लुबाडून घेतील. त्यांच्याकडे ड्रग्ज काय आले, इतके घाणेरडे घाणरडे रोग आले आहेत, सगळा भयंकर प्रकार आहे. म्हणून हे लोक इकडे आले, शांतीसाठी.

देवकृपेने आपल्या संस्कृतिमुळे आपल्यावर वरदान आहे. आपल्या वागण्यांत, आपल्या समजण्यांत पुष्कळ फरक आहे. पण फक्त धर्माच्या बाबतीत आपण कोते आहोत. धर्म कुठे आहे? आंतमध्ये. तो धारणा झाला पाहीजे. तो झाल्याशिवाय बाहयांतले धर्म माणसाने केलेले धर्म आहेत.

अहो देवळांतसुध्दा काय प्रकार आहेत, तुम्हाला माहीत आहेच. नुसते पैसे उकळायचे आणि तिथे आमच्या मुंबईच्या महालक्ष्मीच्या देवळांमध्ये तिथे गांजाबिंजा विकतात अगदी सर्रास. म्हणजे हे काय? देव झोपी गेला आहे, की या लोकांचा असा राक्षसी प्रकार इतका वाढला आहे ते पाहून तिथून उठूनच गेला? लोक म्हणतात, तुम्ही देव देव म्हणतां मग असं कां होतं माताजी? देव हा आहे, पण तुमच्या खिशांत नाही तो. तुम्ही जसं म्हणाल तसं त्याला वाकवू शकत नाही. तुम्ही हवं तसं करू शकत नाही देवाला, देव हा आहे. तो जाणून घेतला पाहीजे. कसा आहे

तो जाणल्याशिवाय आपण उगीचच प्रत्येक देवळांत देव बघतो तसं नाही. आहेत आतां, आहेत, स्वयंभू देवळं, ती ठीक आहेत, पण तेही आता खराब करुन टाकले. माणसाला काही दिल तरी तो ते खराब करुन टाकतो. जंगल तसे स्वच्छ असेल पण चार माणसं दिली, कीं ते तो घाण करुन टाकणार. तसंच धर्माचं करुन ठेवले आहे. सगळे धर्म बिघडवून ठेवले आहेत त्यामुळें आपल्याला असं वाटतं, की अनास्था, मग हा धर्म कसा, माताजी, हे लोक असे आहेत. दुष्ट आहेत, मग कसं काय करतां, आमच्या गुरुने सांगितलं असं पारायण करा, तर आम्ही पारायण केलं तर आम्ही आजारीच पडलो पण असं कसं झालं? अहो तुमचा परमेश्वराशी कधी लागाबांधा झालेला नाही. याचा संबंध मेन्सूशी झाला नाही, तर इकडे बडबडून काय उपयोगाचं होणार आहे कां? माझं? तसंच आहे. संबंधच झालेला नाही.

हा संबंध म्हणजेच योग. मग हा योग झाला की मग परमचैतन्य, जे सगळीकडे पसरलेले असते ते तुमच्यांतून वाहूं लागतं. आणि तुम्ही शक्तिशाली होऊं लागतां. पण आधी हे समजले पाहीजे, की आतांपर्यंत आम्ही जे केलं होते, ते शहाणपण नव्हतं. तुमचे टेलिफोनचे कनेक्शन नाही आणि तुम्ही टेलिफोन केला तर त्यांत काय शहाणपण? जोपर्यंत कनेक्शन नाही तोपर्यंत रामाचं नांव घेतलं, तर राम रागवणारच, की बाबा काय संबंध तुझा? तू माझा कोण होतोस? कळलं ना, तसला प्रकार आहे हा!

तेव्हां काही मंत्र तंत्र तुम्ही काय म्हणत असाल, ते सोडून आधी सहजयोगधारणा करा. मग तुम्हाला कळेल, की तुम्हाला कोणता त्रास आहे. त्याचं मोठं ज्ञान आहे, शास्त्र आहे, उठल्यासुटल्या काय, अमुक मंत्र दिला, अमुक दिला आणि त्याला पैसे दिले. काय बघून दिला की काय? गाढवही देईल ते त्याला गुरुच कशाला पाहीजे? असा अगदी सांगोपांग विचार पाहीजे, जर तुम्हाला चाणाक्षपणा नसता तर मूढांसाठी सहजयोग नाही. रामदासांनी सांगितलं आहे, मूढां-साठी सहजयोग नाही.

रामदासांना विचारलं, किती वेळ लागतो कुंडलिनी जागृत व्हायला? "तत्क्षणीच" सांगितलं आहे, "तत्क्षणीच" म्हटले आहे. त्या क्षणीच कुंडलिनी जागृत होईल, पण अधिकारी पाहिजे, अधिकारी असला तर तत्क्षणीच होणार. अधिकारी नसला तर कधीच होणार नाही. अधिकारी म्हणजे त्या माणसाचं वागणं, त्याचे आयुष्य वगैरे जरी कसंही असलं, काही असलं तरी पहिली गोष्ट पाहीली पाहीजे, की हा कुंडलिनीचे जागरण करतो, की नाही जर तुमच्याकडून तो पैसे उकळतो आहे तर तो काय तुमची जागृति करणार? तो तर तुमचा मिंधा. तुमचा नोकर. तुम्हाला जर म्हटलं, तुम्ही येऊन फुकटखोरी करा, तर तुम्ही कराल का? नाही ना? तर त्याला तेवढाही मान नाही. फुकटखोरी करुन, खोटं बोलून राहतोय, तो सत्यांत उतरायला

पाहीजे. जर सत्याला धरलं आहे, तर जे सत्य आहे तेच मिळायला पाहीजे. मला असा हट्ट धरायचा तरच तुम्हाला सत्य मिळेल. नाहीतर असत्यावर उभे राहीले तर असत्य मिळेल त्याने तुमचा संतोष होणार नाही. समाधान मिळणार नाही आणि ज्यासांठी एवढी धडपड केली, ज्यांसाठी एवढे उपास केले, देवाला टाहो फोडला ते सगळे तुमच्या दारांतच आहे, म्हणून आपल्या हृदयांतला परमेश्वर आपण आधी ओळखलस पाहीजे. हृदयांतला परमेश्वर मिळेल तर त्यानेच आपण जाणूं शकतो सत्य. एकमेव सत्य! सत्य काय आणि खोटं काय!

सध्यातरी आपली स्थिती अशी आहे, अर्थातरी, सध्या, आपल्याला जोपर्यंत आपला परमेश्व-राशी संबंध आलेला नाही, तोपर्यंत परमेश्वराबद्दल धारणा करून कांही होत नाही, तुम्ही परमेश्वरा-ची धारणा करूच शकत नाही. ती आपल्यामध्ये धारणा झाली पाहीजे.

परमेश्वर हा असा, हा तसा, मग त्याला शिव्या द्यायच्या, सांकडी घालायची की तुझं मी एवढं केलं तू माझं कां नाही करत? अरे, पण तुझा संबंधच नाही, बाबा. परमेश्वराने जर तुमचं कांही केलं नाही तर त्याच्यांत त्याचा काय दोष आहे. तुमचा, त्याचा संबंध नको व्हायला कां?

समजा ह्यातांत तुमच्या साप असेल, आणि मी म्हटलं बाबा, साप आहे. पण अंधार आहे, दिसत नाही, तर तुम्ही म्हणणार, 'दोरच आहे, साप नाही.' पण प्रकाश आला, तर त्या प्रकाशांतच कळेल ना की हा साप आहे म्हणून. पण आधी प्रकाश तर घेतला पाहीजे. म्हणून पूर्णपणें समजून घेतलं पाहीजे सगळ्यांनी, सहजयोग्यांनीसुध्दां, की अजून ज्यांना प्रकाश मिळाला नाही त्यांना प्रेमाने समजावून, सांगून वळवून घेतलं पाहिजे. त्यांना म्हणायचं, 'बघा, आमचं आयुष्य कसं बदलत चाललंय? तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण सगळ्या गोष्टी अगदी पुढयांत येतील, आधी ते मागायचं नाही. आधी मागायचं 'आम्हाला प्रकाश दे.' 'आम्हाला परमचैतन्य दे.' त्याच्यानंतर अगदी सगळं पुढयांत जिथे जाईल तिथे ते समोर. कांही कोणतेही प्रश्न राहाणार नाहीत. सगळं अगदी व्यवस्थित होणार आहे. तेव्हां तुम्ही कृपा करून सहजयोगामध्ये गहनता प्राप्त करा. बाकी सगळं व्यवस्थित होणार आहे. त्या गोष्टीकडे, कशाकडे लक्ष देऊ नका. आणि आपल्यांत जो आत्मा आहे तो जागृत झाला की नाही, त्याची आपल्याला पूर्णपणे प्रचिती आली कां नाही, आपण गहनांत उतरलो की नाही? निर्विचारतेच्या पलिकडे निर्विकल्पांत उतरलो की नाही इकडे लक्ष ठेवा.

सहजयोग म्हणजे जसं कांही नुसतं बाजारांत जायचं तसा सहजयोग ज्यांनी केला, त्यांना सहजयोगाचा कांही एक लाभ होणार नाही. गहनांत उतरलं पाहीजे वेळ दिला पाहिजे. आजकाल वेळ कमी आहे पण सहजयोगाला दहा मिनीटं सकाळी, दहा मिनीटं संध्याकाळी, आवरानें केलें पाहीजे. मग सगळे कांही व्यवस्थित होईल

लावून घ्या लावून घ्या ते आपण कांही मानत नाही· बायकांना वैधव्य येतं, पुरुषांना येत नाही, आपण कांही मानत नाही ते· सगळी अंधश्रध्दा आहे· बेकाराच्या गोष्टी, आपल्याला अंधश्रध्दा ठेवायची नाही, डोळे उघडायचे आणि पहिल्यांदा प्रकाशांत यायचं आणि काय आहे ते पाहायचं· रूढीगत, रूढीगत आहे ते सगळं, त्या रूढीला तोडून टाकलं पाहीजे आणि आपणच समजलं पाहिजे की या मोठया मंदीराचे आपणच खांब आहोत आणि आपल्यावरच सगळं आधारभूत होणार आहे· आता तुम्ही सुरुवातीचे सहजयोगी आहांत म्हणून मी तुम्हांला सगळं समजावून सांगितलं· पण तुम्ही काय सगळ्यांना सांगत सुटू नका, हळूहळू समजवायचं, त्यांची सुटका करा· नाहीतर जाऊन सांगितल्यावर, 'अरे बाबा हा तुझा गुरू आहे याला सोड', मारायलाच धांवतील· तर शहाणपणा नाही व्यवस्थित आरामांत, त्यांना समजावून सांगायचं, 'हे सोडा'· काय मिळालं तुम्हाला? इतके दिवस तुम्ही केलं· काय मिळालं तुम्हाला, तुमच्या आईवडिलांना काय मिळालं? जे खरं आहे ते मिळविलं. तुम्हीच स्वतःचे गुरु होऊ शकतां, मग कां नाही मिळवावं·

तर आतां सहजयोग तुमच्या दारी आला आहे, तर तुम्ही सहजयोग घ्यावा, स्विकारावा, त्याचे वर्णन करावे, इतकेच नव्हे तर डोक्यावर घरुन त्याचे वर्णन सर्वांना सांगावे असा तो आहे आतां आम्ही हे कार्य काढलं आहे, तुम्ही ते करावं आणि स्विकारावं·

**श्रीरामपूर पुजा**

सहजच सगळं काही घडून येतं, हे लक्षात ठेवले पाहीजे आणि परमचैतन्य सगळं कांही घडवीत असतं ते आपल्या हितासांठी आणि भल्यासांठी· हे घडताना कांही घडामोडी घडतात त्या आपल्या विरोधांत पडतात, इच्छेविरुध्द घडतात, 'असं कां झालं', वगैरे वगैरे वाटतं· त्यावेळी असं लक्षांत ठेवलं पाहीजे की आपल्याजवळ परमचैतन्यापेक्षां जास्त बुध्दी नाही· आपले हित जितके परमचैतन्याला माहीत आहे तितके आपल्याला माहित नाही· तेव्हा नसत्या उस्ताफे-या करून आपली डोकी खर्च करण्यांत कांही अर्थ नाही· ज्या लोकांनी परमचैतन्याचा अनुभव घेतलेला आहे त्यांनी त्या विश्वासात बसलं पाहिजे की जे होते आहे ते आपल्या भल्यासांठी घडत आहे· त्याने आम्हाला अद्दल तरी घडेल किंवा आमचा फायदा होइल किंवा आम्हाला शिकतां तरी येइल· हे जर तुमच्या लक्षांत आले नाही तर तुम्हांला सहजयोग समजला नाही· सहजयोगांत येऊन तुम्ही वाया गेले· जी गोष्ट असेल ती मान्य केली पाहीजे, आणि मान्य केल्यावरच गोष्टी आपोआप घडत असतात·

माझं "आम्ही" ही व्यवस्था केली - जिथे हे ममत्व आलं तिथे सगळं चुकतयं हे सहजयोगात लक्षात ठेवा· म्हणून मग हे असे त्रास भोगावे लागतात· ममत्व आलं की ते तोडणा-रच· देवीबद्दल म्हटलं आहे "संकल्प विकल्प करोति", असे नसते. संकल्प करायचे नाहीत--

स्वतःबद्दल. तुमचा कांही माझ्यावर हक्क लागत नाही, कोणाचाही. आणि हमखास मी त्याचठिकाणी जाईन जिथे कोणी म्हणत नाही ही "आमची" जागा आहे. सहजयोगांत एवढंही आलं नाही तर तुम्ही कांही मिळवलं नाही. सगळं बेकार. सहजयोगात पुष्कळ शिकावं लागतं. आता ही मंडळी ज्यांना कसला वारसा नाही, देवाचं नांव ऐकलेलं नाही ही मंडळी इतकी शिकली आणि तुम्ही नाही शिकले.

तुम्ही जरी हिंदुस्थानांत आला तरी तुम्ही समोरच बसले पाहीजे. परदेशांत गेला तरी पुढेच बसणार. पाहुण्या लोकांना पुढे बसवलं पाहीजे, हे काय सांगायला पाहिजे? परंपरागत आपल्याला माहीत आहे तरी समोरच येऊन बसायचं. दुसरं एक सांगितलं, पायावर यायचं नाही कारण पाय माझे सुजून जातात. तरी हात मध्ये घालायचा. काल एकाचा हातच चेंगरून जात होता. मग म्हणायचं, 'असं कसं झालं. आम्ही माताजींच्या पायावर गेलो आणि हातच मोडला', म्हणूनच मोडला. सहजयोग म्हणजे कसा तावून सुलाखून तुम्हांला काढून देऊ. अर्धवट काम नाही.

"येरा गबाळ्याचे काम नोहे,

तेथे पाहीजे जातीचे"

देवाच्या साम्राज्यांत तरी किती जागा आहे असं तुम्हांला वाटतं! भारूडभरती करायची नाही- आपल्याला, तर संथपणाने आपल्याला आधी स्थित करून घेतले पाहीजे. आपल्या आत्म्याच्या दमावर उभे राहिले पाहीजे, विश्वासात उभे राहीले पाहीजे. जे होतंय ते उत्तम होतय ही भावना ठेवली पाहीजे सारखी, कारण आम्ही परमेश्वराच्या साम्राज्यांत आलो. परमेश्वर हा सर्वसाक्षी आहे. सर्व शक्तिमान आहे. त्याच्या शक्तिने सर्व कार्य करतो आहे. स्वतः काही करत नाही, सगळं नाटक बघतो आहे. त्या शक्तिला सर्व कांही माहीत असतं पण ही माया रचली जाते ती एवढयासां-ठी की माणसाने शिकावं. त्याच्या डोक्यांत आलं पाहीजे की परमेश्वर म्हणजे काय.

पण आतां आपल्याला ही सवय, की जोपर्यंत देवळांत जाऊन गर्दी नाही झाली, चारपांच माणसांना आपण चेंगरलं नाही, चेंगराचेंगरी करून पोचणार नाही, आपलं डोकं फोडणार नाही, त्याचे पाय तोडणार नाही, तोपर्यंत जे दर्शन झालं त्या दर्शनाला काही अर्थच नाही. म्हणजे काय राक्षसीपणा आहे हा. बाहेर यायचं म्हणजे पाय माझे नुसते आवळून धरायचे हे काय दर्शन झाले? 'आले म्हणे आतां, निघालो', कां? 'झालनां दर्शन'. अहो, दर्शनासांठी कितीतरी देवळं आहेत तुम्हाला, त्या देवळात तुम्ही जा, मला कशाला त्रास देतां! आमच्यावर काय उपकार होत आहेत? तुम्ही स्वतःवर उपकार करतां त्याचा फायदा तुम्हाला होणार आहे, त्याचा पुण्यलाभ तुम्हाला होणार आहे. त्याचं सगळं काही ज्ञान तुम्हाला मिळणार आहे. हे जर आपण लक्षात घेतले तर सहजयोगांत

करां .

सहजयोगाची संस्कृति एक वेगळी, आगळी संस्कृति आहे. समुद्रासारखं आपण सर्वांच्या खाली राहायचं म्हणजे सगळ्या नद्या खाली एकत्र येतात. माथ्यावर बसलेल्या सरोवराला केवढया नद्या मिळतात? तर एकावर एक चढायचं एकाला एक दाबायचं, काय हा वेडेपणा! हे सहजयोगी कां असं करताहेत? इतकी वर्ष सहजयोगात घालवली, अजून तसेच वागून राहीलेत. यांना कसं सांगू बाबां, काय मोठं चांगल चाललंयं या राज्यांत पण परमेश्वराच्या राज्यांत आनंदीआनंद आहे. सगळे संत साधू तिथे जाऊन बसले आहेत आणि आपल्याला सध्या तिथे जायला मार्ग मिळाला आहे तर कशाला या लहानलहान बाबतीत खितपत पडायचं आणि त्यातच रहायचं.

सहज संस्कृति आपण स्विकारली पाहीजे. विश्वनिर्मलाधर्म स्थापन झाला, अमेरीकेमध्ये. तो अमेरीकेत जाऊन स्थापन व्हावा. इथे नाही, त्याला कारण लायकी पाहीजे, ती हिंमत पाहीजे. मी सात वर्षाची असताना विश्वनिर्मलाधर्माची गोष्ट केली होती. हिंमत पाहीजे तर विश्वनिर्मला-धर्मात तुम्ही आल्यावर हे कर्मकांड सुटून, अगदी शांत, एखाद्या सागरासारखे शांत, एकेक व्यक्ति सागरासारखी जर तुमच व्यक्तित्व एवढ वाढल नसेल तर सहजयोगांत येऊन तुम्ही करणार काय? बीचं "बी" च होऊन रहाणार. त्याचा वृक्ष व्हायला पाहीजे ना. सुमति ही पहील्यांदा आपल्या अनुभवास आली पाहीजे आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल जे होतात ते फार.

आमच्या साहेबांनी सांगितलं, "मला एक सहजयोगी दे. मला लायब्ररीला जायचंय". तर त्यांना ऑफिसमध्ये फार उशीर झाला निघतां निघतां. लायब्ररी शेवटाला आली तर तिकडचा इंग्लिश मनुष्य फार ओरडायला लागला. तुम्ही इतक्या उशीरा आले, हे झालं, ते झालं, तो सहजयोगी शांतपणाने म्हणाला, "बघा, आमच चुकलेलं आहे कारण आम्हाला माहीत नव्हत की लायब्ररी या वेळेला बंद होते. आमचंच चुकल, आम्ही कबूल करतो. तुम्ही का चुका करता? लगेच तो बदलला आणि व्यवस्थित वागू लागला हे सहजयोग्याचं लक्षण आहे की प्रत्येक गोष्टीवर मात करणं नाही आलं तर सहजयोगी नाही. मी म्हणते ना, ज्याला पोहणं येतं त्याला कशाचीच भिती वाटत नाही. बुडण्याचीही नाही. पोहोण्याचीही नाही. कशाचीच नाही. कोणाचीही लहर आली तर त्याच्यावर आम्ही मात करणार. जर तुम्ही मात करू शकत नाही तर मिळवलं काय इतकी वर्ष?

सहजयोगाची विशाल स्थिती आपल्याला अजून समजली नाही, की आपण सागर झालो. प्रत्येक किना-यावर आपले निनाद येतात. छत्तीस देशांतन हे लोक आले आहेत. कल्पना करा अजून एक गाणं आपण हिंदुस्थानी मिळून म्हणू शकत नाही. हिंदुस्थानी सोडा. एका गावातले, एका गल्लीतले म्हणू शकत नाही. एका घरांतले म्हणू शकत नाही आणि हे छत्तीस देशात एक गाणं निनादत म्हणजे काय? तेव्हां विचार ठेवा.

पहील्यांदा कान धरून असं म्हणायचं की आम्ही ममत्व सोडलं. आम्हाला मिळवायचे काय याकडे लक्ष दिल पाहीजे हे इथले लोक या भूमीत राहाणारे लोक, इथला वारसा, अहो साधूसंतांना कोणची जागा? 'इथे बसलो ती आमची जागा,' या मस्तीत राहाणारे ते लोक आणि तसे तुम्हाला आम्ही करून ठेवले आहे. देवदूतासारखं तुम्हाला बनवून ठेवले आहे. गणेशांसारख्या तुम्हाला जन्म दिला आहे, तर तुमचं काय हे? कसोटीला उतरलं पाहीजे, ते सुटलं तर तुम्हाला कसोटीला लावण्याची सुध्दा आमची हिंमत होत नाही. जरा कसोटीला लावले की पळाले, सहजयोगांतून पळाले, आमचं जमत नाही, आमच होत नाही, काय हे सहजयोगी आहेत का काय।

तर सर्वांनी एक गोष्ट समजून घेतली पाहीजे की सहजयोगी म्हणजे आपण होतो तसे राहाणार नाही. आता आपण एक वृक्ष झालो आहोत. काहीतरी मोठेपण आलेले आहे. आम्हा सामान्यांतून असामान्य केले आहे. अहो, किती लोकांना पूर्वी आत्मसाक्षात्कार होत होता? आत्मसाक्षात्कार झाला, केव्हढं आम्ही मिळवल आहे. त्या घोडयाला कळतं, सापाला कळतं, तुम्ही आत्मसाक्षात्कारी झाला आहांत, सा-या सृष्टीला कळतं तुम्ही साक्षात्कारी आहात. तुम्हाला कधी कळणार?

भिका-याला उचलून सिंहासनावर बसविलं तरी तो आपला भीकच मागतो

आधी होती दासी,

राणीपद झाले तिसी

तिचे हिंडणे राहीना,

मूळ स्वभाव जाईना.

पण सहजयोगात मूळ स्वभाव जायलाच पाहीजे, हे झालेच पाहिजे. नाहीतर सहजयोगच नाही मग तो बेकार आहे. एका अंडयातून एक पक्षी निघतो, तर अंडयातले काय राहून जातं त्यांच्यात? एका फुलांतून फळ निघतं तर फुलातला वास राहातो त्यांच्यात? तसेच जे तुम्ही मानव होता आधी ते कसेही असले, तरी आज तुम्ही अतिमानव झालात, ती शक्ति गेली कुठे? परत परत त्याच कुसंस्कारांनी झाकून जातो आम्ही.

मग कोणाच्या दमावर आम्ही सहजयोग करायचा? 'आदिशक्ति' तुमची आई आहे! कोणाची आई आदिशक्ति आहे? केव्हढे भाग्यशाली तुम्ही? तसे आमचेही भाग्य आहे, पण तसे जातीचे पाहीजेत। तेव्हाच आईला आनंद होतो. अमेरीकेहून आता फार सुंदर एक पत्र आलं होतं, त्यांतले सगळे वेगळे वेगळे विचार वाचून आनंदाने वाटलं, वा, वा, वा, काय माझी मुलं आहेत।

आता एकजुटीने राहायला पाहीजे. कालच मी सांगीतल, भाऊबंदकी फार आहे. ही म्हणजे एक मिथ्या गोष्ट आहे. अगदी मिथ्या गोष्ट. माझं हे गाव, माझ ते गांव, माझी ही

मुलं, माझा हा बाप, माझी ही आई हे सगळं मिथ्या आहे. ज्ञानेश्वरांनी सांगीतलं "तेची सोयरे होती."

आम्ही सगळी व्यवस्था करायला तयार आहोत. सगळे खर्च करायला तयार आहोत. दोन चार पैसे इकडे तिकडे झाले त्याने आमचा काही फरक पडणार नाही. हे म्हणाले रात्री, फार थंडी, उद्या तरी माताजी थोडं उन पाडा" पडेल, झालं. चंद्र आपल्या हातांत, सूर्य आपल्या हातांत. सारी सृष्टी आपल्या हातात आहे. माणसाची डोकी कशी आपल्या हातात आणायची, ते मात्र मला समजत नाही. सगळा वारसा आहे, योगभूमीत बसला. आहांत तुम्ही, किती मोठी माणसं आहांत तुम्ही, ते लक्षात घ्यायचे, की असं वागायचं! भटक्या लोकांसारख जो पर्यंत एक मनुष्य 250 लोकांना जागृति देत नाही. तोपर्यंत माझ्या पायाला हात लावायचा नाही. माझ्या पाया पडायचं नाही. अधिकार नाही तुम्हांला.

आता पाहुणे आले, त्यांचा मान केला पाहीजे, त्यांना पाहुणचार केला पाहीजे, हे मी काय नवीन सांगायला हवं कां? पण आपली मुलं बघून पटकन पुढे येऊन बसायचं. पटकन! आता असं करायच नाही. शहाण्यासारखं वागायचं, अहो कुठे नेऊन पोचवलं आहे तुम्हाला आम्ही. ते गगन गडकर म्हणत होते,"माताजी कशाला तुम्ही यांना आत्मसाक्षात्कार दिला. मी बेडूक होतो, तेव्हापासून देवासाठी टाहो फोडत होतो. म्हटलं 'आणखीन करा'. पण तुम्ही यांना का दिला? म्हटल "आमची मर्जी" पण तुमची मर्जी यांच्यावर कशाला आली? आम्हाला तुमच्याबद्दल इतक्या आशा होत्या त्या तुम्ही सिध्द करायला पाहीजे. आम्ही जे वचन दिलं ते दिलं. आता तुम्ही जे वचन दिलं ते तुम्ही करायला पाहीजे. तुम्ही उठून उभे राहायला पाहीजे. सगळ्यांनी हिंमतीने काम घेतलं पाहीजे. आपापसातली भांडण सोडायची, लहानपण सोडायचं, मोठेपण घेतलं पाहीजे म्हणजे सगळ्या साधूसंतांच्या आत्म्याला केवढा आनंद होणार आहे.

सगळे, आहेत, इथे बसले आहेत तुमच्या मदतीला. आता हे लक्षांत ठेवा की आपण परमचैतन्यांत आहोत आणि आपल्याला परमचैतन्यांत पूर्णपणे विलीन झालं पाहीजे. सगळं कार्य तोच करतो. आपण त्यांच्या हवाली सगळं करून प्रार्थना करायची हृदयापासून. सगळे प्रश्न सुटून सगळं उत्तम होणार आहे. तुम्ही नुसता विश्वास ठेवा. अनेक गोष्टी अशा झाल्या आहेत, त्याच्या विश्वासाच्या आहेत. पण तो विश्वास अजून हृदयांत बसत नाही. हृदयांत बसल्यावर मनुष्यांत तेजस्विता येते. ज्यांना सहजयोग समजला आहे त्यांना ही गोष्ट माहीत आहे.

-x-x-x-x-x-x-

श्री माताजींच्या "पुणे" येथील पुजेच्या वेळी दिलेल्या भाषणांतील काही उतारे :-

सहजयोग जो आमचा आहे, त्याने विश्वनिर्मलाधर्म म्हणून धर्म स्थापन केला आहे म्हणजे जगातले सगळे धर्म आम्ही मानतो. गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे आणि सगळयाच मोठया संतसाधूंना आम्ही मानतो. सगळयाच.

गाडगेमहाराजांना मी भेटलेली आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल, त्यांनी मला ओळखलं होतं. ते स्वातंत्र्यवीर होते. तुकडोजी महाराज, गाडगे महाराज सगळे आमच्या घरी आले. तेव्हा मी लहान होते आणि त्यांनी सांगीतलं की एक दिवस असा येईल की तुम्ही या भारतवर्षाचं कल्याण कराल. संतांच्या मागे आम्ही आहोत, एवढचं नव्हे तर संतांच कार्य पुढे चालवायचं आहे आम्हाला. संतांनी माणसाला कधीही दैववादी केल नाही. किंवा कधीही कतृत्वावर घातलं नाही.

आजकाल एकेक उपटसुंभ निघाले आहेत. त्यांच असं म्हणणं आहे की तुम्ही नुसती विज्ञानाची कास घ्या. आमचं असं म्हणणं आहे, की तुम्ही सत्याची कास घ्या. विज्ञानांत हिंदुस्थानांत कोणी मोठे शोध लावले आहेत? आपला वारसाच अध्यात्माचा आहे, त्याला काळं फासून विज्ञान घेऊन बसले आहेत. इकडे आमच्याकडे कितीतरी असे लोक आहेत की जे विज्ञानांत निष्णात. इथे नसतील अशा त्यांच्याकडे पदव्या आहेत. त्यांत तीन चार हिंदुस्थानी लोकही आहेत. त्यांनी शोध लावले आहेत. त्यात मी पण त्यांना काहीतरी सांगीतले आहे आणि ते म्हणतात "माताजी, तुम्ही सांगितलेले, ते बरोबर आहे" ही एक गोष्ट मी त्यांना सांगितली, की कार्बन अॅटम जो असतो तो आपल्या मुलाधारांत असतो. कार्बन अॅटमला चार व्हॅलन्सीज असतात. अहो या तुमच्या अंधश्रध्देच्या माणसाने माझं तीन तास डोकं खाल्लं. त्याला कार्बन म्हणजे काय, त्याची व्हॅलन्सी म्हणजे काय ते माहीत नाही. हे कसल विज्ञान करणार आहेत!, एका माणसाला धरून उभं केलं, त्याने काय लोक, हा देश होतो?

आपली प्रगतिच विज्ञानांत काही नाही. त्याला कारण असं की आपली प्रगति अध्यात्मांत झाली ही परमेश्वराची इच्छा आहे. आपली अध्यात्मांत एवढयासाठी एव्हढी प्रगति झाली आणि होणार आहे. त्याला कारण असं की, विज्ञान हे झाडासारखं बाहेर सगळीकडे वाढलं आहे. मूळाची त्याला माहीती नाही. मूळाशिवाय ते झाड कसे राहाणार? ते मूळ इथे भारतांत, विशेषतः महाराष्ट्रात आहे. हे अध्यात्म नसल्यामुळे विज्ञानाला संस्कृतीच नाही. विज्ञानाला प्रेम म्हणजे कशाशी खातात हे माहीत आहे का? प्रेमाची व्याख्या, किंवा कोणतीही जिवंत वस्तू कशी काम करू शकते त्याबद्दल ते सांगू शकत नाहीत. एका "बी" ला जर मातीत घातल तर ते वर येतं त्यावर कोणची क्रिया घडते, कोणती जिवंत क्रिया घडते?

विज्ञानाला आपली मर्यादा आहे. अध्यात्माला मर्यादा नाहीत. त्याला अभ्यासिले पाहीजे. त्यांत उतरलं पाहीजे आणि वाढ करून घेतली पाहीजे.

मला पुष्कळ लोकांनी विचारलं की माताजी तुम्ही ख्रिस्ती धर्मात जन्म का घेतला त्याचं कारण म्हणजे आमचे आईवडिल हे अत्यंत विशेष होते. अत्यंत धार्मिक आणि उच्च प्रतीचे लोक

होते. असे लोक आजकाल मिळायला कठीण. माझ्या आईने ऑनर्स मॅथमॅटिक्समध्ये केलं होतं. तुमच्या या फर्ग्युसन कॉलेजमधून. रँग्लर परांजपेंची ती शिष्या होती. आणि वडिल संस्कृताचे पंडित होते. त्यांना 14 भाषा येत होत्या. त्यांत आणखी ख्रिश्चन होते, हे आणखी बरं.

करण ख्रिश्चन लोकांची आपल्या ह्या हिंदुस्थानात अशी वाईट स्थिती आहे, त्यांना असं वाटतं की ख्रिस्त हा इंग्लंडमध्ये जन्मला तर इंग्लिश लोकांचं अनुकरण करायचं. त्यांच्यासारखं वागायचं, त्यांच्यासारखे कपडे घालायचे, त्यांच्यासारख हुंदडायचं, हे एक ख्रिश्चन धर्माचं लक्षण. दुसरं म्हणजे आमचे प्रोटेस्टंट ख्रिश्चन आहेत, ते बुध्दिवादी आहेत. त्यांनी ख्रिस्ताला आपल्याबुध्दीमध्ये बसवले आहे. त्याचाकोरीत बसविले आहे आणि त्याच्याहीपेक्षा ( ) धर्ममार्तंड म्हणजे फॅनॅटिक्स मी पाहीले आहेत. भयंकर, अत्यंत अंधश्रध्देने भरलेले लोक, अत्यंत. त्यांना काहीही कसलं चालत नाही. रविवारी उठायचं, तयारबियार व्हायच कसतरी, चर्चला जायच, घरी यायचं झालं, संपलं काम. सगळा धर्म तिकडे आला. कामात आणि बाकीच्या वेळेला उखाळ्या पाखाळ्या काढत बसायच्या, म्हणजे महाराष्ट्रीयन. तेव्हढा भाग जर धरला तर, बिल्कुल महाराष्ट्रीयन कशा असतात ना बायका, पुरुष. याचं काढ त्याचं काढ. आणि ख्रिश्चन झाल्यावरसुध्दा जातियता त्यांच्यात!

म्हणजे आम्ही लोक आता शालिवाहनाचे वंशज, आणि शालिवाहन आता मोठे राजपूत होते. आणि हे लोक होते मोठे चितोडचे तिकडे, तर ते नांव आणायचं कुठे? तर त्यांना श्याण्णव कुळी बनवलं. शहाण्णव कुळी मराठे आणि त्यांना सालवे असं नांव दिलं. आणि आता पुस्तकांत ते व्यवस्थित सालवे असं लिहीतात. आणि त्या शहाण्णव कुळीतलेच ख्रिश्चन आम्ही लग्न करणार. अहो, कुठे मिळायचे? इथेच तर मिळत नाही आणि तिथे कुठून मिळणार?

"मग तुमचं गोत्र काय?" इथून सुरवात. आता हिंदू लोकांना पण त्यांच गोत्र माहीत नसतं. पण ख्रिश्चन जे मराठयातले झाले आहेत किंवा ब्राम्हणातले झाले आहेत त्यांना पक्कं माहीत त्यांचं गोत्र बित्र. लग्न करायचं ते सुध्दा एक चर्चमध्ये झालं तर झालं नाही तर घरी येऊनसुध्दा मग सगळे तेच प्रकार. त्याच्यामुळे मला सगळं माहीत आहे. अजिबात काहीही मग तिकडे ख्रिश्चन धर्म दिसत नाही.

सगळा तो प्रकार तसाच्या तसा, म्हणजे नावाला ख्रिस्ती व्हायचं आणि त्यांतली एवढी तरी त्यांची बाब सुटली असती, की जात नको तर तेही सोडायचं नाही. म्हणजे इथपर्यंत की आमच्या सगळ्यांच्या कुंडल्या काढल्या. हो, आणि महाराष्ट्रात एक वाईट पध्दत आहे की आत्येकडे देतां येतं तर. माझ्या दोन्ही बहिणींना आतेकडे दिलं आणि भावाला मामांकडे दिलं. म्हटलं नशीबाने

माझ्यावेळेला असा काही प्रकार नव्हता आणि गांधीजींकडे गेल्यावर, गांधीजींनी सांगीतलं सगळ्यांना बाहेर करा म्हणून आम्ही सटकलो त्यांच्यात, नाहीतर आम्हालाही कोणी आत्या किंवा मामाच्या घरी घालून टाकलं असतं हा इतका प्रकार या ख्रिस्ती लोकांचा.

दिसायला फार सोज्वळ दिसतात. पण अकलेचे बारा वाजलेले. काही त्यांच्या डोक्यात जाणार नाही. आता माझे या हिंदुस्थानांत किती ख्रिस्ती शिष्य आहेत माहीत आहे? इन मीन बाबा मामा सोडून कोणी नाही.

आणि सगळ्यांनी अगदी बहिष्कार टाकलाय माझ्यावर, की 'हे काय कार्य करते आहेस तूं? तूं हे हिंदू धर्माचं कार्य करतेस! बरं हिंदु लोक म्हणतात, 'तुम्ही ख्रिश्चन धर्माचा प्रचार करता,' म्हटलं बरं आहे. तो एक ठप्पा माझ्या डोक्यावर आहे. तिकडे ख्रिश्चन लोक म्हणतात तूं हिंदू धर्माच कार्य करतेस. अहो, संन्याशाला काय जात आणि धर्म असतो काय! तर हा प्रकार, म्हणून मी ख्रिस्ती धर्मात जन्म घेतला.

आणि इतका मला अंदाज आला होता. सुरवातीलाच की हे ख्रिस्ताच्या नावावरती काय एकेक तमाशे करून राहीले आहेत आणि आता ख्रिस्तानंतरच जन्म घ्यायचा तर इथेच घ्यावा म्हटलं. बघते आतां या सगळ्यांना. ते मला यांचे सगळे प्रकार माहीत नसते तर या सगळ्यांना मी ठिकाणावर आणलं नसतं. म्हणजे हा सगळा प्रकार मला ठाऊक होता म्हणून यांना भेटू शकले. यांच्याबरोबर बोलू शकले यांच काय चुकलं ते मला कळलं.

जातीचं खूळ, तुम्हाला आश्चर्य वाटेल पण तुम्ही मुसलमान झालात तरी असतं. बुध्दधर्मी, बुध्दधर्मी झाले तरी ते जातपात बघतात. काय, आपल्याला रोग लागला आहे जातीचा ते बघा. जातीतच लग्न करायचं. काय फायदा आहे ते मला समजत नाही. जातीत लग्न करायचं मग तो दारूडा असेना का, मरतुकडा असेना का? त्याने मारून टाकल तरी चालेल. जातीचा हवा. अहो, हे पाप आहे. हा राक्षसीपणा. या राक्षसीपणाच्या गोष्टी आहेत. आपल्या पोटच्या पोरींना तुम्ही असं कराल कां! लहानपणी, 'अग बबली, बबली' सगळं होईल आणि मोठी झाली की, 'जा चुलीत नाहीतर विहीरीत जाऊन उडी मार!' काही केल तरी चालेल, हुंडा द्यायचा. हे सगळे जातीचे प्रकार तोडले पाहीजेत. आता मला हे बघायचं आहे की आपले सहजयोगी तरी किती मुलंमुली बाहेर लग्न करतात. त्यांचतरी सुटलं आहे का? आता सहजयोगी होऊन काय सुटलं आहे बघायचं. ख्रिश्चन होऊन आमचं सुटल नव्हतं. त्याचा काही संबंध नाही. जात! पण जातीचा तुमचा काय संबंध? हे तुमचे सोयरे आहेत ना, "ते चि सोयरे होती"?

सहजयोगांत जातपात मुळीच चालणार नाही. ज्यांना जातपात चालवायची त्यांनी कृपा करुन सहजयोग सोडून जावा. हां, हे माझं म्हणणं नाही की कदाचित जातींतं जर तुमचं लग्न झालंच, किंवा असा जर आम्हालाच, आम्ही अगदी ठरवलं होत. जातीत लग्न करायचं नाही. दोन्ही जातीत, पण आम्ही किती प्रयत्न केला तरी आमच्या नशीबी हेच दोघे आले. इतकी उत्तम पोरं आहेत की आणखी काय बोलायचं. नशीबांत तेच होतं. आम्ही इतका प्रयत्न केला मुलांसाठी बाहेर लग्न करायचा, पण ते काय जुळल नाही.

तेव्हा आज ख्रिस्ताच्या या शुभजन्माच्या शुभप्रसंगी, आपण आता असा विचार केला पाहीजे की त्यांनी आपल्यासाठी एवढे हाल सोसले. त्याला क्रुसीफिकेशन झालं, सूळी दिलं, खांबी चढवलं, मारुन टाकलं हे सगळं आपल्यासाठी झालं ना कारण आपण मूर्ख होतो. पण आता आपल्या मुलींनाच आपण सूळावर चढवतोय म्हणजे केव्हढे मोठे आपण खरे लोकं आहोत बरं मुलींना सुळावर चढवायचं, बोललीस तर खबरदार, तुला मी मारुनच टाकीन. तुझ्या नव-याचा मी खून करुन टाकीन. बाकी मर्दूमकी काही नाही. मुलीवरच सगळी मर्दूमकी.

मला म्हणे की रामदासांचं नाव वाचा. रामदास काय म्हणताब, "मराठा तितुका मेळवावा: आता मराठ्यांना बघायला गेले तर कुठे गेले मराठे? "बस्त्याला बसलेत।" तलवारी कुठे आहेत? "आता तलवारी कुठे माताजी? "आता पेटयात टाकून बसलेत, तिथे बस्त्याला' हे नवीनच काढलय; बस्त्याला, त्यांना काही साडयातलं कळतं का? साडया खरेदी करा आणि नेसा नंतर. शहाण्णव कुळी आहेत म्हणे.

तर या सगळ्या गोष्टींच्यामुळे कधीकधी असं वाटतं की एवढे सगळे मोठमोठाले अवतरण झाले, उदाहरणं झाली अहो, तहत किती वर्षापासून या जातीपाती वरती लोकांनी इतक शरसंधान केले पण ते कोणाच्या डोक्यातच जात नाही का? गांधीजींचा पुतळा उभारा, त्याला हार घाला, पण ते गांधीजी काय बोलत होते? ते टिळक काय बोलत होते? आगरकर काय बोलत होते? आगरकरांनी तेव्हढं ब्राम्हणांवर काढलं. दास गणू काय म्हणत होते? नृसिंहसरस्वति काय म्हणत होते!

"ते काय तरी असलं माताजी, तरी आम्ही ना माळी आहोत. तर माळीतच लग्न बरं" असा कां. "माळी करतो काय? तसा चांगला आहे. थोडा दारु पितो. त्याला बायकांचाही छंद आहे म्हणे." पण तो माळी आहे ना, मग काय माळी जावई असला मग तो काय तुम्हाला स्पेशल काही करणार आहे का? असे ख्रिस्तांनी एवढा मोठा त्याग केला. जगात आले एवढ मोठं कार्य केलं. कसं त्यांनी करुन दाखविलेलं आहे की एका कुमारिकेच्या पोटी जन्म घेतला. किती पावित्र्य

आहे त्याला आणि ते पावित्र्य परमेश्वरी आहे. कुमारिकेच्या पोटी इथे काही जन्म झाला, तर सगळेच मरायचे. चूक पुरुषाची असली, तरी मुलीलाच मारायचं. तुझच चुकलं. पत्ताद्या बाईला पुरुषाने टाकली की तुझंच चुकलं. त्या पुरुषाचं नाही चुकलं. अरे बाबा त्या बाईला टाकली पुरुषाने की तिने झुरुन झुरुन मरायचं. कुणाला वैफल्य आलं म्हणजे, तूं आपल्या नव-याला सांभाळ, सांभाळ म्हणजे व्यवस्थित.

हे प्रकार ख्रिस्तीधर्मात नव्हते म्हणून आमच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्म घेतला. पण त्यांतले ते भोपळ्याचे प्रकार पाहीले म्हणजे डोळ्याचं जे भोपाळं झालेलं आहे, ते पाहून मी थक्क झाले।. म्हणजे आता जायचं तर कुठे जायच? आणि तर हा आपला सहजधर्म आहे. यात बुध्दिही तल्लख पाहीजे. अक्कलही पाहीजे, हृदय मोठं पाहीजे आणि सगळ्यात म्हणजे आपण मागासलेले नाही आहोत. अल्ट्रामॉडर्न लोक आहोत. मॉडर्नच्या वर गेलेले पॅरामॉडर्नीझम आहे. सहजयोगात गेलेत

तर घरांत टेलिफोन लावाल, टि.व्ही. लावाल, सगळं लावाल पण मुलीला मात्र, "चूप बैस तिकडेच", "असे का बोललात तिला, "तर सासू तिला मारेल तर प्रॅक्टिस असू या. मग तिला मारायला का पाठवता तिकडे; सासूकडे? म्हणजे तुम्हाला काही प्रेम आहे की नाही त्या मुलीचं?

आज ख्रिस्ताच्या या जन्मदिवशी, आपण व्रत घेतलं पाहीजे की आम्ही जातीपाती मोडून काढणार, एकवेळ ब्राम्हण मोडतील पण मराठे नाही मोडायचे. म्हणून मराठ्यात एकही संत साधू झाला नाही आजपर्यंत. एक मीच आहे म्हणायची कारण ते तिकडे जाऊन बसतात ना बसल्याला।. ध्यानाला कधी बसणार?

तेव्हा आपल्या मुलींचे असे हाल करु नका. त्यांचं आयुष्य ठीक करा आणि डोकं उघड करा. भूतांच्या आहारी जायच नाही. ख्रिस्ताच्या आयुष्याला फारच थोडे दिवस असे मिळाले की तो लोकांना समजावून सांगू शकला. फक्त चारच वर्ष पण किती काम करुन गेले ते. पण त्याची घाण मात्र या लोकांनी करुन टाकली. आता आधी सांगीतलंच आहे ईंग्लिशमध्ये. तसेच आपल्या इथे जातपात नको म्हणून सुधारकांनी इतकी मेहनत घेतली आहे, पण आपण जातीपातीचं असं शेपूट मागे लावून घेतलय की शरीर तुटेल पण ते शेपूट काही तुटणार नाही. ते नवीनच उगवलं आहे. जेव्हा गांधीजी आम्हाला सांगत असत, जवळजवळ तीस, चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट सांगते तुम्हाला, तेव्हां जातीमध्ये लग्न केलं की वाळीत टाकत असत की हा कुठून आला, मागासलेला, युसलेस मनुष्य, कुठल्या खेडयांतून आला, खेडवळ लोक त्याच्याबद्दल बोलत असत. आता उलट झालंय. आता मोठेमोठे श्रीमंत, शिकलेले, विद्वान ठासून डिस्कस करतात, की साडी कोणती

घ्यायची। वा। वा। वा। आणि नाही बोललं तर रूसायचं, रागवायचं, कुठल्या स्थितीला आलोय आपण आता। अहो आम्ही असे धुरंधर लोक पाहिले आणि हे कुठले हे बाजार भुणगे। मला समजतच नाही. कोणच्या देशांतून हे इथे जन्माला आले. भलत्या गोष्टी करायच्या। काही त्याच्याबद्दल संभावितपणा नाही, मोठेपणा नाही.

आजच्या या मोठया समारंभाच्या दिवशी एकच विनंती आहे, की ख्रिस्ताला तुम्ही वचन द्यावं की तू जातपात मानली नाहीस तसं आम्हीही मानणार नाही. हृदयापासून सगळ्या सहजयोग्यांनी द्याव. कोणतीही जातपात मानणार नाही. ईश्वर सर्वांना आशिर्वादीत करो.

----------

ब्रम्हपुरी पूजेच्या वेळचे श्री माताजींचे भाषण :-

आतां आपल्या महाराष्ट्रीयन लोकांना असं सांगायचं आहे की आपल्या देशामध्यें एक तऱ्हेचा नवीनच भूतांचा प्रकार सुरु झाला आहे आणि या भूतांच्या प्रकारांत राक्षसी प्रवृत्ति, आसुरी प्रवृत्ति फार वाढली आहे. ते काल आपल्याला दिसलंच. आणि ती वाढून त्याचा अतिरेक काल झाला, आणि या लोकांना त्याचा पुष्कळ त्रास सहन करावा लागला, तेव्हा आपल्या सहजयोगी लोकांना असं सांगायला पाहीजे की याबाबतींत आम्ही तयारीत असायला पाहिजे, नुसती माझी पुजा करुन, आरती करून काम होत नाही. आपल्याला पुष्कळशा गोष्टी करायला पाहीजेत आणि त्यासांठी आपण खांद्याला खांदा देऊन पुढे आलं पाहीजे, दंड ठोकून उभे राहीले पाहीजे, आता आम्ही सहजयोगी आहोत.

पण अजूनही आपण अशा गोष्टी करीत आहोत की ज्याच्यामुळे आपल्यांत कमजोरी आली आहे. मुख्य म्हणजे जातियता. मी सारखी जातियतेबद्दल बोलते आहे, त्याला कारण काय की एकदां तुम्ही जातियतेमध्यें गेला की तुमच्यामध्यें जी एक मुलभूत बांधणी आहे तीच तुम्हांला रोकते. जातीयतेला धरून बसणं ही फार चुकीची गोष्ट आहे. आणि हे जर आपण सोडलं असतं तर अंधश्रध्दा समोर आली नसती. कारण आपल्याला जर माहीत आहे की अंधश्रध्दा जी आहे ती फक्त आत्मसाक्षात्कारानंतर येते. पण आत्मसाक्षात्कार आल्यावर सुध्दां आपण त्याच जातीच्या मार्गे जातो, त्याच जातीशी संबंध करतो आणि तशाच रितीने मूर्खासारखे वागत असलो तर तुमची कांहीही वाढ होणार नाही आणि नुसतंच एक राजकारणी तऱ्हेचं सोंग होइल. अशी सोंगं घेऊन जर आपण सहजयोगी झालो तर आपल्याला काय लाभ होणार आहे? जैसे थे। असे राहाणार आहोत आपण.

आपल्याला पुष्कळशा गोष्टी सोडाव्या लागणार आहेत. त्यांत धर्मांधता जी आहे ती सुटली पाहीजे. धर्मांधता म्हणजे, आधी मी म्हणत होते की देवळांत जायचं नाही. देवळात जाऊन

ब्राम्हणाला पैसे द्यायचे नाहीत. कुंकू लावून घ्यायचं नाही. त्यांच्यात आतां थोडीशी सुधारणा झाली आहे. त्याला कारण असं की, लोकांना त्रास होतात. पण घरांत ब्राम्हण आणून लग्न करणं हे सुध्दां चुकीचं आहे. ब्राम्हण कोण होतात लग्न करणारे? तुम्ही ब्राम्हण झाले मग ब्राम्हणाला आणून लग्न कशाला करायचं? लग्न हे व्यवस्थित सहजयोग पध्दतीने झालं पाहीजे. अणि जोपर्यंत लग्न सहजयोगपध्दतीने होत नाही तोपर्यंत मी त्याची हमी देऊं शकत नाही, की हया लग्नाचं व्यवस्थित होइल. बरं परत आपल्या महाराष्ट्रांत लग्न म्हणजे अगदी सगळ्यांत मोठं धर्मकार्य आहे. लग्न म्हणजे काय! मग त्याच्यासाठी मुलीसाठी पहाणं, हे करणं, मग बस्त्याला बसणं, हे नी ते, घाणेरडे प्रकार चालू असतात. लग्न ही फारच क्षुल्लक गोष्ट आहे. सहजयोगामध्ये त्याचं इतकं महात्म्य नाही. एका सहजयोग्याचं दुस-या सहजयोगिनीशी लग्न झालं की, त्याचं काय एवढं महात्म्य नाही आहे की आयुष्यभर त्याच्याशी लढत बसावं लागतं. जातीजातीत लग्न करून त्याचे जे दुष्परिणाम होतात, ते दिसतात आपल्याला. पण अजूनही आपण त्याच्यांतच फसतो. तेव्हां सगळ्यांनी आज व्रत घेतलं पाहीजे की आम्ही कोणत्याही धर्मांत, कोणत्याही जातींत, कोणत्याही देशांत लग्न करू. तुम्हाला याळीत टाकण्याचा प्रश्नच नाही कारण तुमचे सोयरे हे आहेत. तुमचे नातलग हे आहेत, जे तुमचे नातलग आहेत, ते कसे वागतात ते तुम्ही पाहीलंच आहे.

कालच बघा, गांवातल्या लोकांनीच तुम्हांला त्रास दिला ना? तुमच्या पाहुण्यांना त्यांनीच मारलं ना? त्यांनी तुमची कोणती मोठी पत ठेवली? आतां काय वाटत असेल यांना तुमच्याबद्दल? मी म्हणते ते नुसतं ऐकून, "हो माताजी म्हणतात, पण असं कांही विशेष नाही" असं म्हणून बसायचं नाही. जोपर्यंत आपल्यांतली जातियता जात नाही, हुंडाप्रकार जात नाही, आपल्यांतली अंधश्रध्दा जात नाही, आणि जोपर्यंत आपण उठून उभे रहात नाही या बाबतीत, सबंध समाजाला एक उदाहरण म्हणून, तोपर्यंत आपण सशक्त नाही.

आतां आपण कुठलेही मोठाली माणसं पाहू यां. आपल्यासमोर टिळक आहेत, आगरकर आहेत, शिवाजीमहाराज आहेत. अशी जी मोठीमोठाली माणसं जी झाली त्यांनी काय केलं, ते कसे वागले, त्यांच्याकडे लक्ष दिले पाहीजे. शिवाजीमहाराजांनी सुध्दां त्यांना चारदां लग्न करावं लागलं. राजकारणासाठी त्यांना ते केलं. राजकारणासाठी मला करायचं आहे, ते मी केलं पण ते निःसंगांत होते. त्याच्यावर त्यांचा परिणाम नव्हता. काही करावं लागलं तर केलं. चार लोकांशी आम्हालां दोस्ती करायची आहे. जातपात पाहीली नाही, की शहाण्णव कुळीच असली पाहीजे की, अमकंच असलं पाहीजे. त्यावेळी ज्यावेळी इतक्या वर्षांपूर्वी गागाभट्टांना इकडे येऊन त्यांना राज्याभिषेक करावा लागला, तेव्हा या जातीपातीच्या लोकांनी त्यांना किती हिणवून टाकलं, की तुम्ही कुणबी आहांत तुम्ही मराठा नाही म्हणून.

तुमची कोणतीही जात असेना कां, तुम्ही आज सहजयोगांत आलांत, तुमची जात बदलली, तुमचा धर्म बदललेला आहे. हा धर्म विश्वनिर्मला धर्म आहे. तो तुमच्यात जागृत झालेला आहे त्यामुळे तुमच्या वाईट सवयी गेल्या, सगळं कांही गेलं. पण हे भूत अजून गेलेलं नाही. तुमच्या जातीच्या लोकांशी तुमचा संबंधच नाही आला पाहीजे. कारण ही जमात, जी तुमची आहे, ती भूतं आहेत सगळी. दारु पिणं, मारणं मग ते दारु पिऊन नाही तर काही करां, हुंडा घेओ नाहीतर कांही करो, पण ते आमच्या जातीतलंच असलं पाहीजे मग तुम्ही सहजयोगी कसे? मग सहजयोग सोडा तुम्ही, काय तुम्ही दोन धर्मांत उभे राहु शकतां का?

त्याच्यामुळेच काल यांना मार खावा लागला. हे लोक, ज्यांनी सर्व धर्म सोडला, परमेश्वर सोडला, आणि आम्ही कांहीच असं करत नाही असे करून उभे राहीले. त्यांनी काल मार दिला त्यांचे थोडेसे कारण मला असं वाटतं आपल्यामध्ये जी कांही थोडीशी कमजोरी आहे ती त्यांनी ओळखली आणि त्यांच्यामध्ये आपण अंधश्रध्देला पूर्ण झालो. पण जर तुम्ही बोलत सुटलांत कीं आम्ही सहजयोगी आहोंत. आम्हाला कोणतीच अंधश्रध्दा नाही. आम्ही कोणत्याच असल्या गोष्टींना मानत नाही. आम्ही सहजयोगी आहोत, आम्ही बोलत नाही, करून दाखवू तुम्हाला. तेव्हा या लोकांच्या लक्षांत येइल की काहीतरी विशेष मंडळी आहेत.

आम्ही आमच्या वडिलांना पाहीलं. त्यांना गांधीजींनी सांगितलं, सगळ्या तुमच्या मुलांची लग्नं बाहेर करा. आम्हीसुध्दां शहाण्णवकुळीच आहोत, तेव्हां फार विचार करून होत असत लग्न त्यावेळी. वडिलांनी लगेच सांगितलं, "कांही हरकत नाही, कुठेही लग्न करा." आणि सगळ्यांची अशीच लग्नं लावून दिली आमची. तर काय आमचं वाईट झालं? त्यांनी सांगितलं मी कॉंग्रेसचा माणूस आहे. मला काय जात नाही, धर्म नाही मी गांधी धर्मी आहे. तेव्हा धर्म जर घ्यायचा तर पूर्णपणे घेतला पाहीजे. अर्धवट लोकांसाठी हा धर्म नव्हे, तेव्हांच तुमच्यांत खरी शक्ति येइल. तेव्हांच तुमच्यामध्ये ते पावित्र्य येइल की ज्याने सगळ्यांचं, सगळ्यांचं रक्षण होऊ शकतं. पण जर तुम्ही अर्धवट असला तर तुम्ही कोणाचंच रक्षण करू शकत नाही. स्वतःचंही नाही, दुस-यांचंही नाही.

ते पावित्र्य आणण्यांसाठी एकदम निःसंगांत येऊन उभं झालं पाहीजे. जसे आपल्या देशामध्ये मोठेमोठे लोक झाले. टिळकांचं उदाहरण घ्या-त्यांनी एका विधवेशी लग्न केले. गांधींच उदाहरण घ्या-ते एका हरिजनाच्या झोपडीत जाऊन जेवत असत. कृष्णाचं उदाहरण घ्या-विदुराकडे जाऊन जेवत असत. रामाचे उदाहरण घ्या-त्याने भिल्लीनीची बोरं खल्ली. जी मंडळी अशी मोठी झाली त्यांच्यात किती वैशिष्ट्य आहे ते बघा. जर खरोखरच तुम्हांला सहजयोगांत यायचं असलं तर पहिल्यांदा समजलं पाहीजे की सहजयोगांत, तुम्ही फार विशाल होता. तुमच्या ज्या संकुचित जीवनाच्या ज्या पध्दति आहेत त्या सगळ्या बदलून तुम्ही फार विशाल होता. तुम्ही

"हे विश्वचि माझे घर" असे म्हटले. पण नुसतं बघायचं, गाणं म्हणायचं याला कांही अर्थ नाही. हे लोक बघा आपली संस्कृति सोडून तुमच्या संस्कृतित येऊन बसले. कारण हे चांगले आहे म्हणून तर तुम्ही त्यांच्यापासून हे तरी शिका. हे जातपात बघंत नाहीत. कितीतरी लोकांनी आपल्या हिंदुस्थानी बायकांशी लग्नं करून आणि त्यांचं फार भलं केलं. नाहीतर पूर्वी एखाद्या इंग्लिश माणसाला हिंदुस्थानी बायको दिली तर तिला मारुन खायचा तो. म्हणा इथे अजून मारुन खातातच. बायकांना मारुन खाणे हा इथे एकच आमचा खाण्याचा धर्म आहे.

तरीसुध्दां आपण त्यारितीने वागतो, बायकांची इज्जत करायची नाही. सगळ्यांच्यासमोर भांडायचं, सगळ्यांना बोलायचं, बायकांना दाबून ठेवायचं. तेंव्हा ही शक्ति जी आहे तुमच्या इथली तिला तुम्ही जोपासून घेतली पाहीजे. त्यांना शिक्षण दिलं पाहीजे, वाढवलं पाहीजे. त्यांच्या आवडीनिवडी प्रमाणे त्यांची लग्नं केली पाहीजेत. त्यातल्यात्यात त्यांची सहजयोग्यांशीच लग्न केली पाहीजेत म्हणजे मुलंसुध्दां सहजयोगी होतील, जन्माला जी उद्याची पिढी येणार आहे.

तुम्ही किती महत्वाच्या पदाला आले आहांत ते तुमच्या लक्षांत येत नाही. शिवाजीमहाराज आणि मावळे होते, त्यांच्यापेक्षां अत्यंत महत्वाच्या जबाबदारीच्या कामावर तुम्ही आलेले आहांत. आणि सहजयोगांत आले आहात. माझ्याजवळ जरी दोन सहजयोगी असले तरी चालेल पण त्यांनी पूर्णपणे सहजयोगी असलं पाहीजे नाहीतर सहजयोगात आलं नाही पाहीजे. पहिली गोष्ट.

दुसरं म्हणजे मी जे म्हणते ते मानलं पाहीजे कारण मला सगळं दिसतं आहे. मी सर्वसाक्षी, सर्वदृष्ट आहे. मला सगळं समजतं आहे. तिसरी गोष्ट म्हणजे "माताजींनी असं म्हटलं" असं म्हणून कांही मला वापरायचं नाही. माताजी असं म्हणणार नाहीत आम्हांला माहीत आहे.

एकंदरीत तुमच्यापासून मला इतक्या अपेक्षा कां आहेत, त्याला कारण एकच आहे. कारण मी फार शक्तिमान आहे. माझ्यांत फार शक्त्या आहेत. फक्त तुमचे दिवे तुम्ही स्वच्छ करा. म्हणजे प्रकाश द्यायला मी तयार आहे. तुम्हांला एकाहून एक मोठी माणसं करून सोडीन मी. आणि काय गांधी काय नी टिळक काय त्यांच्यापुढे तुम्ही म्हणजे काय, दैदिप्यमान होऊ शकतां. एवढे मोठे सुधारक आणि एवढे मोठे महत्वाचे लोक तुम्ही होऊ शकतां पण आधी तुमचे दिवे तुम्ही स्वच्छ करा. जर ते दिवे स्वच्छ झाले नाहीत तर तुम्ही जिथल्यातिथे कुजून मरणार. आणि सहजयोगाची बदनामी आहे.

तेंव्हां प्रत्येकाने हे लक्षांत घेतले पाहीजे की माताजींमध्ये अत्यंत शक्त्या आहेत. पण त्या जर वापरायच्या आहेत तर त्याचे जे साधन आम्ही त्याचे आम्ही प्रकाश आहोत. ते प्रकाश आमच्यातून वहाण्यासांठी ते दिवे स्वच्छ असले पाहीजेत. त्याची पूर्ण तयारी असली पाहीजे. ध्यान-धारणा करायलाच पाहीजे. जे आमच्यामध्ये निषिध्द आहे ते करायचंच नाही. सहजयोगांत पुष्कळशा

गोष्टी निषिध्द आहेत आणि त्या गोष्टी सोडायच्याच. आतां पुष्कळशा लोकांची व्यसनं सुटली आहे. पुष्कळशे लोक दारुबिरु सोडून व्यवस्थित झाले आहेत. पण पैशाच्या बाबतीत, व्यवहाराच्या बाबतीत अगदी चोख असलं पाहीजे. अगदी सडेतोड असलं पाहीजे. चार लोकांत गेलं की सहजयोगाच्या गोष्टी तोंड उघडून बोलल्या पाहिजेत, काय तरी तिथे संभवितपणा आणून, चूपचाप बसून चालणार नाही. सहजयोगाच्या बाबतीत, सडेतोडपणाने बाललंच पाहीजे. त्यांना सांगितलं पाहीजे, "सहजयोग हाच आजच्या युगाचा धर्म आहे. तो घेतला नाही तर सर्वांचा सर्वनाश होणर आहे." सगळ्यांना, ह्यांना, त्यांना तुमच्या नातलगांना पत्र लिहा. आम्ही सहजयोगांत हे मिळवलं आहे.

आतां तुम्ही लोकं पत्रिका छापतां त्यांत सुध्दा माझं नांव असायला पाहीजे. आतां मी तुमची कुलदेवता आहे. तुम्ही माझया कुळांत आले तर मी तुमची कुलदेवता आहे. बाकी सगळ्या देवतांना कांहीही लिहायची गरज नाही. आज मी स्पष्टपणे सांगते की ज्या लग्नामध्ये माझं नांव नसेल त्या लग्नाला माझा आशिर्वाद नाही. आज मी जिवंत आहे तुमच्यासमोर. हे अवतरण तुमच्यासमोर आलेलं आहे. जे अवतरण समोर आहे त्याला न मानतांना जे नाही त्याला मानण्यांत काय अर्थ आहे? मग आमचे मोठे लोक असे म्हणतात आणि लहान लोक असे म्हणतात तर कांही नाही. आमचा कुणाशी संबंध नाही. आमचा फक्त माताजींशी संबंध आहे. त्या म्हणतील ते.

पण तुम्हीच नातलगांच्या जबडयांत जातां. मगरीच्या तोंडात पाय ठेवायचा आणि बोटीवर पाय ठेवून तुम्ही बोटीवर येणार नाही. जे नातलग तुमचे, सहजयोगी नाहीत त्यांच्याकडे जेवायलासुध्दां जायचं नाही, त्यांचं अन्नसुध्दां घ्यायचं नाही, म्हणजे तुमचे आजार होणार नाहीत. तुम्हाला त्रास होणार नाहीत. तुम्ही या धर्मात पूर्णपणे आलात सर्व त-हेने, आश्चर्य वाटेल की किती प्रगति होईल तुमची याच्यांत. पण जर तुम्ही अर्धवटपणा केलांत तर त्याची फळं तुम्हाला भोगावी लागतील. तर जे खरं ते मी तुम्हाला सांगितलं. मी तुमची आई आहे. खरं ते मला सांगायलाच पाहीजे. मला कोणाचाही राग नाही किंवा दुष्टावा नाही. पण तुमचं भलं व्हावं, हित व्हावं आणि तुम्ही सत्याची कास धरली पाहीजे. सत्याची ज्या माणसानें कास धरली त्या माणसाचे कधीही नुकसान कोणत्याही प्रमाणात होऊ शकत नाही.

तेव्हां आजचा हा फार शुभप्रसंगी दिवस आहे. कालचं फ्रहदं हे झालं ते सगळं विसरून जा. त्याचा अर्थ नाही पण त्यांत आपल्यामध्येच अजून सहजयोगाची ती धमकी आलेली नाही. नाहीतर एखाद्या गांवात जाऊन लोकांनी मारामा-या करण्याची कोणाची हिंमतच होणार नाही. पण आपल्यातच ती धमक असायला पाहीजे की नुसतं एका डोळ्याने पाहीलं की सगळं ठीक होऊन जाईल. तेव्हां सहजयोग्यांनीसुध्दां आतां लक्षांत घेतलं पाहीजे की, प्रत्येक गावांत, प्रत्येक

खेडेगावांत, प्रत्येक शहरांत, जिथे राहतां तिथे सहजयोगासाठी आम्ही काय करतोय? सडेतोड बाललं पाहीजे, गोड बाललं पाहीजे आणि ब्राम्हणाला बोलवून पुजा करायची, सत्यनारायणाची पूजा करायची हे प्रकार करायचे असले तर तुम्ही सहजयोगांत येऊ नका.

सहजयोगांत तुम्ही ब्राम्हण झाले आहांत. सर्व कार्य तुम्ही सहजयोगाच्या दृष्टीने केलं पाहीजे आणि बाकीचं जे कांही आहे त्याला तिलांजली दिली पाहीजे. तर ते अंधश्रध्देवाले कांही बोलू शकत नाही. कारण आपण अंधश्रध्देलाच तिलांजली दिली. त्या कांही वाईट संबंधी होत्या त्या आपण सोडून दिल्या, ज्या कांही जुन्या कल्पना होत्या त्या सोडून दिल्या, आणि मागासलेले नाही आहोत. सगळ्यांत आपण जे वर्तमानकाळांत अत्यंत उच्चतर लोकं जे होतो ते आहांत तुम्ही. उच्चतर, तुमच्याहून उच्च कोणी नाही पण अजूनही तुम्ही त्या नीच लोकांमध्ये राहता मग काय तुम्हांला घाण लागणार नाही? जर हिरा तुम्ही मातीत घातला तर तो हरवायचाच तेव्हां कृपा करून माझ्या गोष्टींकडे लक्ष द्यावे.

वाईट वाटून घ्यायचं नाही. त्याबद्दल माताजी असं बोलल्या असं म्हणायचं नाही. मी जे बोलले ते अगदी हृदयांतून बोलले. आणि हृदयांतून काढून तुम्हांला सांगतेय, तुमची मुलं आहेत, उद्यां पाहायचं कोणाची मुलं वर येतात. पूर्णपणे सहजयोगाला वाहून घेतले पाहिजे. आपलं धर्मांतर झालंय असं समजायचं. आतां आपल्याला दुसरा धर्म नाही ही गोष्ट जर तुम्ही समजून घेतली तर तुमच्यावर उपकार होतीलच पण या देशावरही उपकारच होतील. आणि सबंध जगावर होतील. कारण तुमच्यांत जी एक विशेषता आहे, जे विशेष पुण्य आहे, तुम्ही पुष्कळ पुण्य केलयं म्हणून तर या हिंदुस्थानात जन्माला आलांत. या महाराष्ट्रांत जन्माला आला. पण ते सगळं वाया जाणार, मूर्खपणामुळें ते सगळं वाया जाणार.

आतांपर्यंत कोणचे साधूसंत झाले ज्यांनी जातियतेला मदत केली. दासगणूंनी सुध्दां म्हटलं आहे

"आम्हाला म्हणती ब्राम्हण
आम्ही पाहीले नाही ब्रम्ह
आम्ही कसले ब्राम्हण".

नृसिंहसरस्वतीनी सुध्दां म्हटलं आहे हे सगळे ब्राम्हण होते. त्यांनीसुध्दां म्हटलं आहे मग आपण असं त्याच्या आहारी जायचं आणि तीच तीच कामं करायची किती चूकीचं आहे.

आतां तुम्हाला दर्शन झालंय विशालतेचं तुम्ही माझे सगळे फोटो पाहीलेत. दिव्य आहे सगळं, फार दिव्य आहे. एवढी दिव्यता मिळविण्यासाठी तुम्हालाही दिव्य झालं पाहीजे. आज विशेषकरून मी तुम्हाला सगळ्यांना सांगतेय, मी आता विनंती करणार नाही. कारण खुप

तुम्ही मला केलं पाहीजे. देवीला प्रसन्न करावं लागतं. मी तुम्हांला खूष करणार नाही. तुमच्यातली जी शक्ति आहे, तुमच्यामध्ये साठवलेली जी संपत्ती आहे, तिचा प्रकाश जगावर पडला पाहीजे. आणि तुम्हीच लोक करूं शकतां जास्त ह्यांच्यापेक्षा. कारण तुमच्यामध्ये ती संपत्ती आहे. हे लोक संपत्ती नसतांसुध्दा जास्त त्याचा उपयोग करतात. मग तुमच्याजवळ संपत्ती असतांनासुध्दा तुम्ही त्याचा उपयोग करत नाही असे हे दोन प्रकार आहेत.

तेव्हां कृपाकरून पुढच्या वेळेला मला एकाहून एक सहजयोगी तयार पाहीजेत. इतकेच नव्हे तर प्रत्येकाने जाऊन भाषणे द्यायची. आतां अंगापूरच्या लोकांना माझं इतकंच सांगणं आहे की उद्यां त्यांनी जाऊन संघटना करावी. सहजयोगाच्या लोकांची भाषणं द्यायची आणि खुले आम. इथे एक मोठं पटांगण आहे तिथे बसून सहजयोगाबद्दल सांगायचं. एका नुसत्या भाषणाने, हे लोक आपल्यावर बिथरले होते आणि आपण कधीच भाषण देत नाही. त्यांनी एकदांच भाषण दिलं. तो पोलीसवालासुध्दां बिथरला होता, पण आज त्याच्या लक्षात आलं, तर एवढं वाईट वाटलं त्याला. म्हणजे काम करीत नाही त्याबाबतीत, आपण बोलत नाही. आणि सहजयोगाने मित्रता वाढेल.

तर आतां जाऊन सगळ्यांना सांगायचं, झालं हे फार वाईट झालं, आम्हांला फार वाईट वाटलं. सगळ्यांनी एक सभा करा. जाहीर सभा. ज्यांनी ज्यांनी केलं त्यांनी क्षमा मागितली पाहीजे. अर्थात ज्यांनी ज्यांनी त्रास दिला त्यांचं कांहीतरी वाईटच होणार. मी कितीही प्रयत्न केला, किती क्षमा केली, तरी हे गण आहेत. आणि हे गण त्यांना ठिकाणावर लावतील. पण तरीसुध्दा -सुध्दां तुम्ही सांगायचं की जे झालं ते विसरून जा.

आपल्याला देवधर्माशिवाय चालणार नाही. असल्या फालतू लोकांना इथे जमूं द्यायचं नाही, आणि ही संस्था इथे घ्यायची नाही : ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

## महाशिवरात्रीची पुजा

प.पू.श्री माताजी आपल्या असीम कृपेत महाशिवरात्रीची पुजा पुणे येथे स्विकारणार आहेत. तरी आपण सर्व सहजयोगी बंधू भगीनींनी पुजेमध्ये सहभागी व्हावे.

स्थळ - फ्लोरा पॅलेस मंगल कार्यालय — दिनांक - 23 फेब्रु.90
पुणे सातारा रोड, बालाजी नगर कॉर्नर — टे.नं. 446465
धनकवडी, पुणे 43.

पुणे रेल्वे स्थानकापासूनचे अंतर - 7 कि.मी. स्वारगेटपासूनचे अंतर - 3 कि.मी.
उपयुक्त पी.एम टी. बस-शिजीनगर बस स्थानक मार्ग क्र.2 आणि 27
स्वारगेट स्थानक - बस मार्ग क्र. 2,9,17. बस स्टॉपचे नाव - फ्लोरा पॅलेस.